# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

दिनांक १८.१०.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि १७/१०/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ७५ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन ५४,०००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही. :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये जुगार खेळणाऱ्या विरूध्द जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत दि.१७/१०/२०२२ रोजी जुगार कायद्या अंतर्गत पोस्टे आ.बाळापुर येथे ०१ ठिकाणी छापा टाकुन आरोपी यांचे विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडुन जुगाराचे साहित्य एक मोबाईल व नगदी असा एकुण १७,०००/—रू माल जप्त करण्यात आला असुन आरोपीतांविरूध्द जुगार कायद्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहित अंमर्गत कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्री अंतर्गत दि.१७/१०/२०२२ रोजी दारूबंदी कायदया अंतर्गत हिंगोली जिल्हयात एकुण ०१ ठिकाणी छापा मारूण कार्यवाही करून आरोपीतां कडुन २.३४ लिटर दारू असा एकुण ७८०/—रू.कि.चा अवैध दारूसाठा जप्त करण्यात आला असुन आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायदयाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहे.

**मरणास कारणीभुत असणा—या विरूध्द अपराध दाखल :—**दिनांक १७/१०/२०२२ रोजी फिर्यादी संभाजी माधवराव बिरगड रा ढेगज ता औंढा ना यांचे फिर्यादी वरून पोस्टे औंढा ना.येथे कलम २७९,३०४(अ) भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.१६.१०.२०२२ रोजीचे सकाळी १०.३० वा सु कयाधु नदीवरच्या पुलाच्या अलीकडे हिंगोली ता जि हिंगोली येथे फिर्यादीचा भाउ कोंडबाराव बिरगड हा रोडने पायी जात असतांना ट्रॅक्टर क्र एमएच ३८ एक्स २७८६ च्या चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हे भरधाव वेगात हयगयी व निष्काळजीपणे चालवुन पाठीमागुन जोराची धडक दिल्याने त्यास गंभीर मार लागला त्याचेवर उपचार चालु असतांना तो मरण पावला त्याचे मृत्युस सदरचा ट्रॅक्टर चालक कारणीभुत झाला म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात औंढा ना.पोलीस तपास करित आहेत.